**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२१/०५/२०२६

## प्रगणकांसोबत प्रत्यक्ष घरांना भेटी देऊन मा.आयुक्त महोदयांनी केली घरगणना कामाची पाहणी*

वसई विरार शहर महानगरपालिकेत जनगणना २०२७ अंतर्गत दिनांक १६ मे २०२६ पासून घरयादी व घरगणना कामास सुरुवात झाली आहे. सदर काम शासनाच्या निर्देशानुसार अत्यंत काटेकोरपणे व नियोजनबद्ध पद्धतीने सुरु असून संबंधित प्रगणकांमार्फत प्रत्यक्ष घरभेटी देऊन माहिती संकलित करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सदर कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी महानगरपालिकेचे मा.आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) यांनी दिनांक २१ मे रोजी स्वतः क्षेत्रभेट देत प्रगणकांकडून सुरू असलेल्या घरगणनेच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रगणकांमार्फत नागरिकांकडून माहिती संकलित करण्याची प्रक्रिया, मोबाईल ॲपमध्ये नोंदी ठेवण्याची पद्धत तसेच घरयादी तयार करण्याचे काम याबाबत सविस्तर माहिती घेऊन कामाची पाहणी केली.

मा.आयुक्त महोदयांनी यावेळी प्रगणकांशी संवाद साधून जनगणना कार्य अत्यंत जबाबदारीने, अचूक व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांशी नम्रतेने संवाद साधून आवश्यक माहिती योग्य प्रकारे संकलित करावी, तसेच शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे मार्गदर्शनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी मा.उप-आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी श्रीमती हर्षला राणे, तसेच संबंधित प्रभाग समित्यांचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. सदर घरयादी व घरगणना कार्य नियोजित कालावधीत पूर्ण करण्यासाठी प्रशासनामार्फत आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत असून कामावर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे.

जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून नागरिकांनी देखील आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना आवश्यक ती माहिती अचूक व सहकार्यपूर्वक उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन मा.आयुक्त महोदयांनी यावेळी केले.